# Question Paper
## Set- III
**Std. – 10th EM**
**Subject – Marathi L.L.**

MS-CIT World-class Comprehensive Computer Course | MKCL KLiC Courses — Gateway to Knowledge Lit Careers

**Time : 3 Hrs.** **Marks : 80**

### विभाग १ : पठित गदय


**प्र.१ अ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती सोडवा.** (७)

१) उताऱ्यातील पुढील संकल्पनांचा अर्थ स्पष्ट करा. २

i) वजनाचा मार्ग भलत्याच काट्यातून जातो. ii) असामान्य मनोनिग्रह

| |
|---|
| पंधरवडाभरात फक्त दोन वेळाच साखरभात झाला. एकदा सोकाजीने चोरुन कोळंबीभात चारला व खालच्या मजल्यावरच्या भाऊजी पसरटवारांनी एकदा नागपुरी वडाभात पाठवला होता. एवढे अपवाद वगळल्यास भाताला स्पर्श नाही केला. त्यामुळे मुख्यत: चरबीयुक्त द्रव्ये शरीरात कमी गेली. माझा एकूण निश्चय पाहून चाळीतल्या मंडळींचे आदर दुणावल्याचे माझ्या सूक्ष्म नजरेतून सुटत नव्हते. जी मंडळी माझी, माझ्या डाएटची आणि उपासाची चेष्टा करत होती त्यांनीच "पंत, फरक दिसतो हं!" अशी कबुली द्यायला सुरुवात केली.<br>जनोबा रेग्यांसारख्या अत्यंत कुजकट शेजाऱ्यालाही "पंत, भलतेच काय हो रोडावलेत." असे मान्य करावे लागले. मंडळींच्या प्रशस्तीने मला भीती वाटत होती ती एकाच गोष्टीची म्हणजे मूठभर मांस वाढण्याची; पण असली तुरळक तारीफ ऐकून मी चळण्यासारखा नव्हतो.<br>इतक्या असामान्य मनोनिग्रह आणि जिव्हानियंत्रणानंतर कमीत कमी वीस ते पंचवीस पौंडांनी तरी माझे वजन घटले पाहिजे अशी माझी खात्री होती व त्या खात्रीने मी आमच्या ऑफिससमोरच्या वजनाच्या यंत्रावर पाय ठेवला आणि आणेली टाकून तिकीट काढले. महिन्यापूर्वी याच यंत्राने माझे वजन एकशे एक्याऐंशी पौंड दाखवले होते. एक महिन्याचा उपास, निराहार, शास्त्रोक्त आहार, दोरीवरच्या उड्या इत्यादी उग्र साधना केल्यावर आज तिकिटावर वजन........<br>मिनिटभर माझा विश्वासच बसेना. एकशे ब्याण्णव पौंड आणि भविष्य होते: 'आप बहुत समझदार और गंभीर है!' हल्ली मी वजन आणि भविष्य या दोन्ही गोष्टींची चिंता करायचे सोडून दिले आहे आणि विशेषत: डाएटच्या आहारी तर या जन्मात जाणार नाही. छे, छे, वजनाचा मार्ग भलत्याच काट्यातून जातो. |

**२) आकृती पूर्ण करा:** २




३) तुम्हांला सर्वांत आवडलेला विनोद कोणता? तो का आवडला ते स्पष्ट करा. ३

**प्र.२ आ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** (७)

**१) चौकटी पूर्ण करा.** **२**

भावे सरांच्या प्रयोगातून लेखक या गोष्टी शिकला. → ______ → ______

याच हायस्कूलमध्ये मला भावे सर भेटले. ते आम्हांला भौतिकशास्त्र शिकवत. विज्ञानातील हा विषय शिकवताना त्यांनी केवळ शात्र शिकवलं नाही, तर त्या विषयाची गोडी लावली आणि त्याचबरोबर जीवनाचं फार मोठं तत्त्वज्ञान शिकवलं.

एके दिवशी शाळेत त्यांनी एक प्रयोग करून दाखवला. भिंगाच्या साहाय्यानं सूर्यकिरणांची शक्ती कागदावर एकत्र केल्यास कागद जळतो हे त्यांनी दाखवलं आणि माझ्याकडे बघून ते म्हणाले, ‘‘माशेलकर, तुमची ऊर्जाशक्ती एकत्र करा, काहीही जाळता येईल.’’ एकीकडे मला एकाग्रतेचा मंत्र मिळाला आणि दुसरीकडे विज्ञान समजलं.

आयुष्याचं फार मोठं तत्त्वज्ञान मला भावे सरांच्या या शिकवणुकीतून गवसलं. त्यांना मी कसा विसरू शकेन? भावे सरांप्रमाणेच माझ्या शालेय आणि पुढील शैक्षणिक जीवनात जोशी सर, शिर्के सर, श्री. मालेगाववाला या सर्वांनीच माझ्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीसाठी उत्तम मार्गदर्शन केलं, संस्कार केले. आयुष्याच्या उभारणीसाठी मला याच शाळेने आणि याच शिक्षकांनी भरपूर शिदोरी दिली. संघर्षासाठी आत्मविश्वास मिळवून दिला. जगण्याचे भान दिले. आजही फिरून ते शाळेचे दिवस आठवताना एकीकडे, प्रचंड दारिद्र्याचा सामना करतानाचे क्षण न् क्षण आठवतात आणि त्याचवेळी माझी आई, माझे शिक्षक, माझी शाळा हे ‘माझे संस्कार केंद्र’ डोळ्यांसमोर उभे राहते. मी पुन्हा मनोमनी शाळेत जाऊ लागतो.

**२) एका वाक्यात उत्तरे लिहा.** **२**

i) भावे सर कोणता विषय शिकवत? ii) लेखकाने 'संस्कार केंद्र' कोणास म्हटले आहे?

**४)** ‘भावे सरांचे शब्द हीच खरी माशेलकरांची उर्जा’ या विधानाचा अर्थ लिहा. **३**

**प्र.१ (इ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** [४]

**(१) भाषाविकासाचा ओघतक्ता तयार करा.** **२**


**भाषाविकासाचे टप्पे :-**

↓
______
↓
______
↓
______
↓
______

भाषा ही मानवाला मिळालेली सर्वोत्तम देणगी आहे. भाषा हे परस्पर संवादाचे एक प्रभावी माध्यम आहे. आपले भाषेचे शिक्षण घरापासूनच सुरु होते. जन्माला आल्यापासून कानांवर पडणारी भाषा आपण आपल्याही नकळत सहजपणे आत्मसात करतो. श्रवणाच्या या टप्प्याकडून आपण हळूहळू भाषणाच्या टप्प्याकडे वळतो. आजीच्या तोंडून ऐकलेली गोष्ट आपण स्वत: सांगू लागतो, ऐकलेली गाणी गुणगुणू लागतो. यानंतरचा टप्पा म्हणजे वाचन. याचे शिक्षण

आपल्याला शाळेतून मिळते. एक एक अक्षर मग शब्द, छोटी वाक्ये असे वाचन हळूहळू जमू लागले की वाचनात रुची निर्माण होते आणि मग याच क्रमाने आपण लेखनाचा टप्पाही सहज पार करतो. वाचनात समृद्धता असेल तर लेखनात कसदारपणा येतो. तसेच लेखन उत्तम असेल तर वाचकाचा आनंद दुणावतो. चांगल्या लेखनासाठी उत्तम हस्ताक्षर हवे, लेखन शुद्ध हवे, दोन शब्दांत योग्य अंतर हवे आणि मुख्य म्हणजे विरामचिन्हे, अर्थदर्शक चिन्हे यांचा योग्य वापर करायला हवा. लेखन अर्थपूर्ण व दर्जेदार असावे.

**२) आकृतिबंध पूर्ण करा.** २




## विभाग २ : पद्य

**प्र.२ अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** (८)

**१) उदाहरणे लिहा.** २

'योगी सर्वकाळ सुखदाता' ही काव्यपंक्ती स्पष्ट करणारी दोन उदाहरणे प्रस्तुत अभंगाच्या आधारे लिहा.

जेवीं चंद्रकिरण चकोरांसी। पांखोवा जेवी पिलियांसी।
जीवन जैसे कां जीवासी। तेवीं सर्वासी मृदुत्व॥
जळ वरिवरी क्षाळी मळ। योगिया सबाह्य करी निर्मळ।
उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता॥
उदकाचे सुख तें किती । सवेंचि क्षणें तृषितें होती।
योगिया दे स्वानंदतृप्ती। सुखासी विकृती पैं नाही॥
उदकाची जे मधुरता। ते रसनेसीची तत्त्वतां।
योगियांचे गोडपण पाहतां। होय निवविता सर्वेद्रिया ॥
मेघमुखें अध:पतन। उदकाचे देखोनि जाण॥
अध:पातें निवती जन। अन्नदान सकळांसी॥
तैसे योगियासी खालुतें येणें। जे इहलोकीं जन्म पावणें॥
जन निनवी श्रवणकीर्तणे। निजज्ञाने उद्धरी॥

**२) तुलना करा.** २

| योगी पुरूष | पाणी |
|---|---|
| i) ____________ | ____________ |
| ii) ____________ | ____________ |

**३) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा.** २

अ) उदक  ब) पांखोवा  क) निर्मळ  ड) मधुरता

**४)** "योगी पुरूष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे", हे विधान तुमच्या शब्दांत स्पष्ट करा. **२**

**प्र.२** (आ) **'औक्षण'** व **'स्वप्न करू साकार'** या दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा. **[८]**

(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री- **१**

(२) कवितेचा विषय-

(३) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश - **१**

(४) प्रस्तुत कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे. - **२**

(५) प्रस्तुत कवितेपैकी कोणत्याही एका कवितेच्या शब्दांचे अर्थ लिहा - **२**

औक्षण – अ) शौर्य ब) बंबारा क) सामर्थ्य ड) औक्षण **२**

अथवा

स्वप्न करू साकार - अ) चैतन्य ब) आभाळ क) तेज ड) शुभंकर

## विभाग ३ : स्थूलवाचन

**प्र.३ पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **६**

१) व्युत्पत्ती कोषाचे कार्य या विषयावर टीप लिहा.

२) 'प्रत्यक्ष अनुभवातून शिकणे' हे अधिक परिणामकारक असते, हे स्वानुभवातून स्पष्ट करा.

३) **टिपा लिहा.**

**सग्वारो कॅक्टस**

- **सग्वारो कॅक्टसचे दिसणे**
- **सग्वारो कॅक्टसचे उपयोग**

## विभाग ४ : भाषाभ्यास

**प्र.४ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

**१) पुढील वाक्यांचे प्रकार ओळखा.** **२**

i) शेण, गोठा, वगैरे जी पडतील ती सारी कामं कर.

ii) तू चित्र काढले आहे.

**२) कंसातील सूचनेप्रमाणे वाक्य रूपांतर करा.** **२**

i) मी परिक्षेत उत्तीर्ण होणार. **(नकारार्थी करा)**

ii) आम्ही तुमचे उपकार कसे विसरू? **(विधानार्थी करा)**

**३) खालील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही दोन )** **४**

i) हकालपट्टी करणे. ii) तिळपापड होणे iii) संघर्ष करणे

**प्र.४ आ) भाषासौंदर्य**

१) **शब्दसंपत्ती** **१**

**i) खालील शब्दांचे समानअर्थी शब्द लिहा.**

अ) उद्यान ब) कन्या

**ii) खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा.** **१**

अ) आशीर्वाद ब) कृतज्ञ

**iii) खालील शब्दांचे लिंग बदला.** **१**

अ) माकड - ब) बोकड -

**iv) खलील शब्दांचे वचन बदला.** **१**

अ) राजा - ब) पोलीस -

२) **लेखननियमांनुसार लेखन करा.** **२**

अ) आज हळदि-कुंकवाचा क्रायक्रम आहे.

ब) निरंजनची गुरूजिंवर अपार श्रद्धा होति.

३) **खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हे वापरून वाक्य पुन्हा लिहा.** **२**

i) मला पुस्तक आणून देतेस का

ii) आई म्हणाली पोटभर खाऊन घे

**प्र.५ अ) खालील कृती सोडवा. (कोणतीही एक )** **(६)**

**१) पत्रलेखन - खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

‘झाडे लावा……झाडे जगवा’

हिरवाई ट्रस्ट, तळेगाव दाभाडे

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त

** रोपांचे मोफत वाटप **

संपर्क – हिरवाई ट्रस्ट, तळेगाव दाभाडे

शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची मागणी करणारे पत्र लिहा.

**किंवा**

तुमचा मित्र / मैत्रिणीला ह्या उपक्रमाची माहिती देणारे पत्र लिहा.

**किंवा**

२) **सारांशलेखन**

**विभाग – १ गदय विभागातील प्र.१ (इ) मधील अपठित उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्र.५ आ) खालील लेखनप्रकारांपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.**

**१) खालील शब्दांचा आधार घेऊन आकर्षक जाहिरात तयार करा.** **५**

गार गार

माफक दर

आईस्क्रीम

थंड – थंड

पत्ता

आस्वाद

२) **पुढील शीर्षकावरून बातमी तयार करा.** **५**

रेल्वे प्रवासात नागरिकांजवळ स्वओळखपत्र असणे अनिवार्य.
(आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, इलेक्शन कार्ड यांपैकी कोणतेही एक.)

३) **कथालेखन**. **५**

**खाली एका कथेची सुरवात दिली आहे. त्यावरून कथा पूर्ण करा.**

एक घनदाट जंगल होते. या जंगलातून राम आणि श्याम प्रवास करत होते. दोघे मित्र गप्पा मारत, गाणी म्हणत पढे जात होते. अचानक समोरील मोठया झडपातन एक मोठे अस्वल बाहेर आले........

प्र.५ **(इ) लेखनकौशल्य** **(८)**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (शब्दमर्यादा १०० ते १२० शब्द)**

**(१) प्रसंगलेखन**

**एकसष्टी सत्कार समारंभ**

**आजीचा एकसष्टावा**

- आजीच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा
- नातेवाईकांची उपस्थिती
- दि.२९ ऑगस्ट दु.११.००
- सत्कार
- औक्षण

वरील प्रसंगी तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करून या प्रसंगाचे लेखन करा.

**(२) आत्मवृत्त**



वरील घटक तुमच्याशी बोलतो आहे अशी कल्पना करून त्या घटकाने आत्मवृत्त लिहा.

**(३) प्रसारमाध्यमांचे महत्त्व.**

मुद्दे :- वृत्तपत्रे (समाजजागृती, लढे, संघर्ष,) रेडिओ, (पूर्वीचा काळ, मनोरंजन, बातम्या) दूरदर्शन (प्रभावी माध्यम, मनोरंजन, मालिका) तटस्थ भूमिका, नागरिक म्हणून आपली भूमिका.